P.R.O Office ,Crime Branch,Pimpri Chinchwad Address:- Office Of The Commissioner Of Police , Premlok Park Chinchwad, Maharashtra - 411033

**प्रेसनोट** **दिनांक – ०५/०२/२०२५**

## "पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड, महाळुंगे औद्योगिक पोलीस संकुल व पोलीस विश्रामगृह देहुरोड या इमारतींचा भुमीपुजन सोहळा ....."

गुरुवार दि.०६/०२/२०२५ रोजी १२.०० वाजता मा. मुख्यमंत्री तथा गृहमंत्री, श्री देवेंद्र फडणवीस, महाराष्ट्र राज्य, यांच्या शुभहस्ते पर्यावरणपुरक व अत्याधुनिक नवीन पोलीस आयुक्त कार्यालय,पिंपरी चिंचवड, अशा या इमारतीचे तसेच महाळुंगे औद्योगिक पोलीस संकुल व पोलीस विश्रामगृह देहुरोड या इमारतींचा भुमीपुजन समारंभ आयोजित केला असुन सदरचा कार्यक्रम हा मा.श्री. मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री, (सहकार आणि नागरी विमान वाहतुक),मा.श्री अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, पुणे जिल्हा, मा.श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास व गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रमुख उपस्थितीत साजरा होणार आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय करीता मा.पोलीस आयुक्त, श्री विनय कुमार चौबे यांनी सततचा पाठपुरावा करुन त्यांचे प्रयत्नातुन एमएनजीएल पेट्रोल पंपासमोर गट नं. ५३९ चिखली पुणे येथे ३.३९ हेक्टर जागा दि.२३/९/२०२४ रोजी मंजुर करुन घेतली होती. सदर जागेचा आराखडा व अंदाजपत्रक तयार करुन त्यानुसार सदर इमारतीसाठी निधी मिळणेसाठी मंत्रालय स्तरावर व्यक्तीशः पाठपुरावा करुन दि.१५/१०/२४ रोजी नवीन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालयाची नवीन इमारत बांधणेसाठी सुमारे १८०.६२ कोटी रु. खर्च करण्यास शासन निर्णयाव्दारे प्रशासकिय मान्यता मिळवली असुन सदर इमारतीमध्ये विशेष शाखा, गुन्हे शाखा, अर्ज शाखा, एमओबी-पीसीबी शाखा, एफआरओ शाखा, महिला सहायक कक्ष, जेष्ठ नागरीक कक्ष, वायरेलस, नियंत्रण कक्ष, वॉर रुम, सीसीटीव्ही रुम, सोशल मिडीया लॅब, कॅन्टीन, जिम, टीएडब्ल्यु, एटीबी, एएचटीयु गुन्हे शाखा, पासपोर्ट व व्हेरीफिकेशन, लेखा शाखा,कॉन्फरन्स हॉल, प्रेस रुम अशी कार्यालये असणार आहेत. सदरची इमारत ही पर्यावरणपुरक व अत्याधनिक असणार आहे.

तसेच पिंपरी चिचंवड पोलीस आयुक्तायल कार्यक्षेत्रामधुन संतश्रेष्ठ तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळयास सुरुवात होते. त्यासाठी लाखो वारकरी येत असतात. त्यांचे बंदोबस्ताकरिता बाहेरुन येणारे पोलीस अधिकारी व अंमलदारांकरिता निवासस्थानाची सोय होणेसाठी देहुरोड पोस्टे येथे असणाऱ्या पोलीस विभागाचे जागेवर देहु तीर्थक्षेत्र विकास आराखडयांतर्गत विश्रामगृह बांधणेसाठी व्यक्तीशः पाठपुरावा करुन मा. विभागीय आयुक्त, पुणे यांनी विश्रामगृह बांधणेसाठी ११ कोटी निधी मंजुर केला आहे. महाळुंगे औद्योगिक पोलीस संकुल तयार करण्यासाठी प्लॉट नं पी-११, फेज२, एच पी चौक, खालुंब्रे, ता.खेड जि.पुणे येथील २० गुंठे जागा ताब्यात घेवुन त्या जागेचा आराखडा तयार करुन त्यासाठी लागणारी अंदाजीत खर्च १८.६६ कोटी रुपये चाकण इंडस्ट्रीयल असोशिएशन यांचे मार्फतीने सीएसआर फंडातुन निधी मंजुर करुन घेवुन वाग्मी फांऊडेशन मदतीने सदरचा प्रकल्प राबविला जात आहे. तसेच पिंपरी चिंचवड मनपा आयुक्त मा.शेखर सिंह यांचे मोलाचे सहकार्याने निर्मित सद्यस्थितीतील प्रेमलोक पार्क, चिंचवड येथील पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय मधील शिवनेरी सभागृहाचे उद्‌घाटन व उपरोक्त नमुद तीनही कार्यालयाचे भूमीपुजन सोहळा महोदयांचे शुभहस्ते होणार आहे.

सदर कार्यक्रमांस मा. श्री. राधाकृष्ण विखेपाटील, (मंत्री, जलसंपदा, गोदावरी कृष्णा खोरे विकास महामंडळ), मा. चंद्रकांतदादा पाटील, (मंत्री, उच्च तंत्रशिक्षण, संसदीय कार्य), मा. श्री. उदय सामंत, (मंत्री, उद्योग, मराठी भाषा), मा. श्री. दत्तात्रय भरणे, (मंत्री, क्रिडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ), मा. श्रीमती निलमताई गोरे, (उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद), मा. श्रीमती माधुरीताई मिसाळ, (राज्यमंत्री, नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकिय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ), मा.श्री. योगेश कदम, (गृह राज्यमंत्री, शहरे) यांचेसह सन्माननीय खासदार व आमदार तसेच इतर लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय.**